MHGA080005102023

**<u>न्यायालय विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क. स्तर), सिरोंचा</u>**
**<u>जिल्हा — गडचिरोली</u>**

( पिठासीन अधिकारी श्रीकांत एस. पचंडी )

**<u>नि.दि.दा.क्र. ३६/२०२३</u>**

१. **शारदा गणपत शिवाला,**
वय—४५ वर्षे, धंदा— शेती,
रा. आलापल्ली,
तह.अहेरी, जि.गडचिरोली. ... **<u>वादी/अर्जदार</u>**

— **<u>विरुध्द</u>** —

१. **रवि किष्टय्या उप्पुला,**
वय—४७ वर्षे, धंदा— शेती,
रा. सुंकरअल्ली, पो.असरअल्ली,
तह. सिरोंचा, जि. गडचिरोली+२. ... **<u>प्रतिवादी/गैरअर्जदार</u>**

---

**<u>दावा घोषणे करीता व कायम मनाई हुकूमा करीता.</u>**

---

वादी तर्फे विद्वान विधिज्ञ ॲड. श्री. ए. एस. पोट्टाला.
प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे विद्वान विधिज्ञ ॲड. श्री. एस. एस. चित्तावार.

---

**<u>आदेश अर्ज निशाणी क्र.०५ वरील</u>**

**(दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी पारित)**

०१) वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरोधात त्यांनी वादी यांच्या दावा मिळकती मधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये याकरीता दाखल केला आहे.

०२) <u>**वादीचे थोडक्यात कथन असे की**</u>,

**दावा मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणेः—**

| अ.क्र. | भु.क्र. | क्षेत्र | गाव |
|---|---|---|---|
| १. | २/७ | ०.८० हे.आर. | मौजा जाफ्राबाद पॅच, तह. सिरोंचा. |

**यासी चतुर्सीमा पुढील प्रमाणेः—**

**पुर्वेस** — दुर्गया शिवाला.

**पश्चिमेस** — प्रतिवादी यांची जमिन.

**उत्तरेस** — चंद्रया शिवाला.

**दक्षिणेस** — जंगल.

०३) वादी यांच्या कथना नुसार त्या मौजा आलापल्ली, तह. अहेरी येथील रहिवासी आहेत. त्यांना दावा मिळकत ही शासनाकडून प्राप्त झाली असून तेव्हा पासून त्या दावा मिळकतीच्या मालक असून दावा मिळकतीवर त्यांचा कब्जा वहिवाट आहे.

०४) प्रतिवादी क्र.१ व २ हे सर्व्हे क्र.२६ चे मालक आहेत तर प्रतिवादी क्र.३ हे सर्व्हे क्र.२२ चे मालक आहेत. सदर जमिनी या दावा मिळकतीच्या पश्चिमेस आहेत. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही हक्क संबंध नाही. अशी परिस्थिती असताना वादी या मौजा आलापल्ली येथे राहतात या गोष्टीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे दावा मिळकती मध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत. वादी यांनी प्रतिवादी यांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता तो निष्फळ झाला आहे. प्रतिवादी यांनी दिनांक ०३/१०/२०२३ तसेच ०४/१०/२०२३

रोजी दावा मिळकती मध्ये प्रवेश केला. तसेच वादी यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

०५) यदाकदाचित प्रतिवादी यांनी वादी यांना दावा मिळकती मधून हुसकावून लावल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. म्हणून वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरोधात प्रस्तुतचा कायम मनाई हुकूमा करीता दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत होणेकामी काही कालावधी जाणार आहे. तो पर्यंत प्रतिवादी यांनी वादी यांच्या दावा मिळकती वरील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०६) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत प्रकरणी हजर होवून आपली कैफीयत नि.क्र.२१ येथे दाखल केली आहे. तसेच नि.क्र.२२ येथे पुरसीस दाखल करुन आपल्या कैफीयतीस अर्ज नि.क्र.५ वरील म्हणणे समजण्यात यावे असे कथन केले आहे.

०७) प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यात वादी यांच्या दाव्यातील सर्व मजकूराचा नकार केला आहे. प्रतिवादी यांनी आपल्या विशेष कथना मध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ हे सर्व्हे क्र.२६ चे तर प्रतिवादी क्र.३ हे सर्व्हे क्र.२५ चे मालक आहेत. त्यांच्या मिळकतीच्या पश्चिमेस सर्व्हे क्र.२७ ची जमिन आहे. सर्व्हे क्र.२७ या जमिनीची प्रतिवादी यांचा कोणताही संबंध नाही. वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरोधात खोटे आरोप केलेले आहेत. वादी ही मौजा आलापल्ली येथे राहत

असल्याने त्यांना त्यांची मिळकत नेमकी कुठे आहे याची माहिती नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०८) वादी यांनी आपल्या अर्जातील कथनाच्या पृष्ट्यर्थ दावा मिळकतीचा सातबारा नि.क्र.०४ अनुक्रमांक १ येथे हजर केला आहे, तर प्रतिवादी यांनी नि.क्र.२५ अनुक्रमांक १ येथे मौजा जाफ्राबाद पॅच येथील भु.क्र.२६ चा सातबारा उतारा, अनुक्रमांक २ येथे मौजा जाफ्राबाद पॅच भु.क्र.२५ चा सातबारा उतारा, अनुक्रमांक ३ येथे मौजा जाफ्राबाद पॅच येथील नकाशा, अनुक्रमांक ४ येथे मौजा जाफ्राबाद पॅच येथील भु.क्र.२२ चा सातबारा उतारा, अनुक्रमांक ५ येथे मौजा जाफ्राबाद पॅच येथील भु.क्र.२७ चा सातबारा उतारा इत्यादी कागदोपत्री पुरावा हजर केला आहे.

०९) वादी तर्फे वकील श्री.ए.एस.पोट्टाला यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथना प्रमाणे युक्तीवाद केला तर प्रतिवादी तर्फे वकील श्री. एस. एस. चित्तावार यांनी आपला लेखी युक्तीवाद नि.क्र.२६ येथे अभिलेखावर दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले.

१०) वादी यांची कथने, त्यास प्रतिवादी यांनी दाखल केलेले उत्तर तसेच वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा तसेच वादी व प्रतिवादी तर्फे वकीलांचा युक्तीवाद या सर्व गोष्टीतुन पुढील प्रश्न माझ्या विचाराधिन निर्माण झाले. त्यांचे उत्तर कारणमिमांसे सह पुढील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादी यांनी त्यांना सकृतदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी.** |
| ०२. | न्यायाचा तराजु वादी यांच्या बाजुने झुकल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे काय ? | **होकारार्थी.** |
| ०३. | प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **होकारार्थी.** |
| ०४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करीता:—**

११) वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत ही त्यांना शासनाकडून मिळाली असून त्यांचा दावा मिळकतीवर कब्जा वहिवाट आहे. प्रतिवादी यांची दावा मिळकतीच्या पश्चिमेस मिळकत आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

१२) याउलट प्रतिवादी यांनी त्यांची दावा मिळकतीस लागून मिळकत असल्याचे मान्य केले आहे. परंतु, प्रतिवादी यांनी ते दावा मिळकतीवर अतिक्रमण करत असल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. प्रतिवादी यांच्या कथना नुसार वादी यांना दावा मिळकतीचे नेमके स्थान माहित नाही.

१३) वादी यांनी दावा मिळकती वरील त्यांचा कब्जा वहिवाट शाबित करण्या करीता दाव्या सोबत नि.क्र.०४ अनुक्रमांक १ येथे दावा मिळकतीचा सातबारा उतारा हजर केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकत म्हणजेच मौजा जाफ्राबाद पॅच, तह. सिरोंचा, जि. गडचिरोली येथील गट क्र.२/७ याच्या भोगवटादार सदरी शारदा गणपत शिवाला म्हणजेच वादी यांचे नाव नमुद आहे. तसेच प्रतिवादी यांनी देखील वादी यांच्या दावा मिळकतीच्या मालकी हक्का संबंधी कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. एकंदरीत वादी यांनी नि.क्र.०४ अनुक्रमांक १ येथे हजर केलेल्या सातबाराचे अवलोकन तसेच प्रतिवादी यांच्या कथनाचे अवलोकन केले असता वादी हे दावा मिळकतीचे मालक असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

१४) वादी यांच्या कथना नुसार प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकती वरील कब्जे वहिवाटीस हरकत करत आहेत. प्रतिवादी यांच्या कथना नुसार वादी यांना त्यांची जागा नेमकी कोठे आहे याचे ज्ञान नाही असे कथन केले आहे. वादी यांनी हजर केलेल्या दावा मिळकतीच्या सातबाराचे अवलोकन केले असता दावा मिळकतीवर वादी यांचा कब्जे वहिवाट असल्याचे दिसून येते. दाव्याच्या या टप्प्यावर प्रस्तुत अर्ज न्यायनिर्णीत करते कामी अभिलेखावर उपलब्ध असणा—या पुराव्यावर भिस्त ठेवून निष्कर्षाप्रत येणे आवश्यक आहे. एकंदरीत वादी यांच्या दाव्यातील कथने, वादी यांनी हजर केलेला कागदोपत्री पुरावा, त्यास प्रतिवादी यांनी दाखल केलेले उत्तर याच्या एकत्रितपणे साकल्याने विचार केला असता वादी यांची दावा मिळकतीवर कब्जे वहिवाट असल्याचे

सकृतदर्शनी दिसून येते.

१५) वादी यांच्या कथना नुसार प्रतिवादी हे वादी यांना दावा मिळकती मधून हुसकावून लावून दावा मिळकतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रतिवादी यांनी आपल्या कथना मध्ये वादी यांचा दावा मिळकती वरील कब्जा स्पष्टपणे नाकारला नसला तरी वादी यांना त्यांची मिळकत कोठे आहे याचे ज्ञान नाही असे कथन केले आहे. यावरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकती वरील कब्जा नाकारत आहेत. यदाकदाचित प्रतिवादी यांनी वादी यांना दावा मिळकती मधून हुसकावून लावल्यास निश्चितच वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांची कथने, त्यांनी हजर केलेला कागदोपत्री पुरावा याचे अवलोकन केले असता निश्चितच न्यायाचा तराजू वादी यांच्या बाजुने झुकल्याचे दिसून येते. तसेच प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. वरिल सर्व परिस्थितीचा विचार करता मी प्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ०४ करीता</u>:—**

१६) तात्पुरता मनाई हुकूम अर्ज याचा मुळ उद्देश हा दाव्याचा विषय अबाधित ठेवणे हा आहे. वादी यांच्या दाव्यातील व अर्जातील कथने त्यास प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे तसेच वादी व प्रतिवादी यांनी हजर केलेला कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन करुन मी प्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून प्रश्न क्रमांक ०४ करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

 MHGA080005102023

नियमित दिवाणी दावा क्र. ३६/२०२३,
शारदा - विरुध्द - रवि व इतर

:::: **आदेश** ::::

०१) वादी यांचा अर्ज नि.क्र.०५ मंजुर करण्यात येत आहे.

०२) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकत म्हणजेच मौजा जाफ्राबाद पॅच, तह. सिरोंचा, जि. गडचिरोली येथील भु. क्र.२/७ आराजी ०.८० हे. आर. या मिळकती वरील वादी यांच्या कब्जे वहिवाटीस दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णया पर्यंत हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात येत आहे.

०३) अर्जाचा खर्च मुळ दाव्यामध्ये विचारात घेण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.04.30 11:49:56 +0530

स्थळ : सिरोंचा
दिनांक: २९/०४/२०२५.

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सिरोंचा.

नियमित दिवाणी दावा क्र. ३६/२०२३,
शारदा - विरुध्द - रवि व इतर

## प्रमाणपत्र

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. आदेशामधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिरोंचा. |
| आदेशाची तारीख | : | २९/०४/२०२५. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | : | २९/०४/२०२५. |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ३०/०४/२०२५. |